जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, औरंगाबाद
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपुरा, औरंगाबाद
दूरध्वनी क्रमांक -0240-2331211/ फॅक्स क्रमांक -0240-2338394
Email I.D. dydeoaurangabad@gmail.com

जा.क्र.2020/निवडणूक/प्रेस नोट /कावि 729

दिनांक 17/11/2020

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी,
औरंगाबाद

विषयः- दिनांक ०१.०१.२०२१ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम
प्रारूप मतदार यादी प्रेस नोट प्रसिध्द करणेबाबत .

संदर्भः
1. मा.भारत निवडणूक निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. २३/२०२० –ERS, दिनांक २४/०८/२०२०
2. मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. २०२०२३/MH/२०२१/WS-II, दिनांक २०/१०/२०२०
3. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. ईएलआर-२०२०/प्र.क्र. ३९५/११/३३ दिनांक २३ ऑक्टोबर, २०२०
4. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. ईएलआर-२०२०/प्र.क्र.३९५/२०/३३ दिनांक १० नाव्हेंबर, २०२०

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक ०१.०१.२०२१ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत दिनांक १७/११/२०२० रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिध्दी बाबत प्रेस नोट यासोबत पाठविण्यात येत आहे.

तरी औरंगाबाद जिल्हयातील सर्वाधिक खप असलेल्या वर्तमानपत्रात बातमी स्वरूपात विनामूल्य व्यापक प्रसिध्दी करून सदर बातमीचे वर्तमानपत्रातील कात्रनासह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने)
(सोबतः- प्रेस नोट)

(डॉ.भारत कदम)
उपजिल्हा निवडणूक अधिकारी,
औरंगाबाद

०१ डिसेंबर २०२०
मतदान करण्यास विसरु नका
आपले अमूल्य मत नोंदवा.
०५ औरंगाबाद विभाग पदवीधर
मतदार संघ निवडणुक-२०२०
जिल्हा औरंगाबाद.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, औरंगाबाद**
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपुरा, औरंगाबाद**
**दूरध्वनी क्रमांक –0240-2331211/ फॅक्स क्रमांक –0240-2338394**
**Email I.D. dydeoaurangabad@gmail.com**

जा.क्र.2020/निवडणूक/ प्रेस नोट /कावि                    दिनांक 17/11/2020

# प्रेस नोट

1. मा.भारत निवडणूक निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. २३/२०२० –ERS, दिनांक २४/०८/२०२० मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. २०२०२३/MH/२०२१/WS-II, दिनांक २०/१०/२०२० अन्वये

2. दिनांक ०१.०१.२०२१ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे.

3. सदर कार्यक्रमानुसार दिनांक ०१.०१.२०२१ या अर्हता दिनांकावर आधारित प्रारूप मतदार यादी औरंगाबाद जिल्हयातील ०९ विधानसभा मतदारसंघांतर्गत सर्व मतदान केंद्रावर, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय इ. ठिकाणी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२० रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

4. प्रारूप मतदार यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १७ नोव्हेंबर, २०२० ते दिनांक १५ डिसेंबर, २०२० या कालावधीत हरकती व सूचना मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे सादर करू शकतात.

5. तरी प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये मतदाराचे नाव, घराचा पत्ता, फोटो, वगळणी, स्थलांतरीत इ.बाबत हरकती व सूचना असल्यास संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे दिनांक १५ डिसेंबर, २०२० पूर्वी सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, औरंगाबाद श्री.सुनील चव्हाण यांनी आवाहन केले आहे.

6. तसेच दिनांक २५ सप्टेंबर, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतीम मतदार यादीनुसार एकूण मतदारांची संख्या 2884823 इतकी होती त्यामध्ये आजरोजी वाढ होऊन ती 2887223 इतकी झालेली आहे. तसेच औरंगाबाद जिल्हयात मतदान केंद्राची एकूण संख्या 2892 इतकी होती त्यामध्ये 86 ने घट होऊन मतदान केंद्राची संख्या 2806 इतकी झालेली आहे.

**सुनील चव्हाण, भाप्रसे**
**जिल्हाधिकारी तथा** 17/11/2021
**जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**औरंगाबाद**